# धर्मप्रांतीय उपासना आयोग, वसई

## महिन्याच्या पहिल्या शुक्रवारचा पवित्र तास

## शुकवार ०३ ऑक्टोबर २०२३

सुरूवातीचे गायन ः भजतो तुला भक्तीने ....

प्रेरक ः प्रिय भाविकांनो, या पवित्र तासाला सुरूवात करताना अत्यंत नम्रपणे व भक्तीभावाने या पवित्र भाकरीत उपस्थित असलेल्या प्रभू येशूला आपण वंदन करू या व त्याच्या उपस्थितीची जाणीव ठेवू या.

*थोडा वेळ शांतता*

या जगात पवित्र जीवन जगण्यासाठी परमेश्वर प्रत्येक व्यक्तीला बोलावीत असतो. पवित्र जीवन जगणे म्हणजे प्रभूठायी जगणे, प्रभू मार्गाने चालणे, प्रभू शब्दानुसार जगणे. पवित्र आत्म्याने परिपूर्ण झालेली आणि अलिशवेच्या भेटीने हर्षभरित झालेली पवित्र मरिया पावित्र्याचा आनंद व्यक्त करताना म्हणते "माझा आत्मा उल्हासला आहे".

आपण प्रत्येक जण देवाच्या भेटीसाठी तळमळत असतो. प्रभू हाच आपल्या जीवनाचा आसरा असतो. प्रत्येक व्यक्तीला प्रभूचे पाचारण असते. मात्र परमेश्वराची वाणी आपल्याला ओळखता आली पाहिजे. त्यासाठी पवित्र मिस्सा, बायबल वाचन, वैयक्तिक प्रार्थना, रोझरी, नोव्हेना, साक्रामेंताची आराधना याद्वारे प्रभूला शरण जाणे गरजेचे असते.

*शांतता*

प्रार्थना ः मानवी दुर्बलतेमुळे आपल्या दैनंदिन जीवनात कळत नकळत चुका, अपराध, राग, द्वेष, मत्सर, हेवा याद्वारे आपण परमेश्वराला दुखवत असतो त्याबद्दल क्षमायाचना करू या. प्रभू येशू आपल्या अंतःकरणाचा दरवाजा ठोकावत आहे आपण त्याला संपूर्ण मनाने शरण जाऊ या.
प्रतिसाद ः प्रभो, आम्हाला क्षमा कर.

१. ख्रिस्ती श्रद्धेपासून दूर जाऊन चुकीच्या विचारसरणीला कळत नकळत बळी पडल्याबद्दल ...
२. कुटुंबामध्ये आईवडिलांचा, आजी आजोबांचा योग्य तो मान सन्मान न केल्याबद्दल ....
३. प्रेमाचे व पावित्र्याचे जीवन जगण्यास एक पतीपत्नी म्हणून कमी पडल्याबद्दल....
४. पवित्र मिस्सा आमच्या जीवनाचा आरसा आहे याची जाणीव तरूण तरूणींना न झाल्याबद्दल ...
५. आम्हाला दिलेल्या बुद्धीचा सुयोग्य वापर करून त्याद्वारे तुझी सुवार्ता गाजविण्यास कमी पडल्याबद्दल...
६. आमच्या आध्यात्मिक विकासासाठी झटणा-या धर्मगुरू धर्मभगिनीवर अनाठायी टीका केल्याबद्दल

थोडा वेळ शांत राहून विविध अपराधाबद्दल दयाळू परमेश्वर पित्याकडे विनम्र अंतःकरणाने क्षमा मागू या.

प्रभूशब्द वाचन ः १ करिंथ १२ ः १ ते ११

परमेश्वराचे वचन आमच्या नेत्रांना प्रकाश देते, आमच्या पावलासाठी दिवा असते. आपण शांतपणे प्रभूवचन लक्षपूर्वक ऐकू या.

गायनः परस्परावर प्रेम करा ..... (गीत क्र. ९५)

चिंतन ः आपणा प्रत्येकामध्ये पवित्र आत्मा कार्यरत आहे व त्याद्वारे निरनिराळी दाने परमेश्वराने आपणांला दिलेली आहेत. ती दाने आपल्याला ओळखता यावीत म्हणून या वाचनावर चिंतन करू या.

*शांतता*

गायन ः तू बोलाविले सेवा कराया.... किंवा प्रभू मज तव आधार हवा रे....

विनंत्या ः

प्रतिसाद ः प्रभो, आमची प्रार्थना ऐक.

१. या नोव्हेंबर महिन्यात सर्वत्र आतिशय चांगले वातावरण असावे म्हणून आपण प्रार्थना करू या.
२. आजच्या तरूण तरूणींना ब-या वाईटाची जाण होऊन प्रसार माध्यमाचा उपयोग त्यांना ज्ञान समृद्धीसाठी करता यावा म्हणून आपण प्रार्थना करू या.
३. ह्या काळात परमेश्वरने आपल्या सर्वांना चांगले आरोग्य द्यावे म्हणून आपण प्रार्थना करू या.
४. आपल्या धर्मप्रांतातील आणि विशेषतः आपल्या धर्मग्रामातील तरूणांना प्रभूच्या मळयात काम करण्याची प्रेरणा व धैर्य लाभावे म्हणून आपण प्रार्थना करू या.

आपल्या विविध गरजा आपण परमेश्वराकडे सादर करू या ः विशेषतः जे आजारी आहेत त्यांना चांगले आरोग्य लाभावे, बेरोजगार आहेत त्यांना रोजगार मिळावा, आपणास आवश्यक असलेले चांगले हवामान लाभावे, इथे उपस्थित असलेल्या सर्व भाविकांना पवित्र आत्म्याचा आरोग्यदायी स्पर्श व्हावा.

आपण पैसा धनदौलत मिळविण्यासाठी आरोग्य गमावतो व आरोग्य मिळविण्यासाठी सर्व पैसा खर्च करतो, आपण भविष्याच्या काळजीत वर्तमान गमावतो त्यामुळे आपण वर्तमानही जगत नाही व भविष्यातही जगत नाही. आपण असे जगतो की आपण कधीच मरणार नाही आणि असे मरतो की कधी जगलोच नाही. हे महान सत्य आपणांस समजावे म्हणून प्रार्थना करू या.

साक्रामेंताचा आशीर्वाद शेवटचे गायन ः घेऊनी हाती ध्वज प्रीतीचा